-२१७ -३-

राज्य शासकीय कर्मचा-यांनी उत्तीर्ण व्हावयाच्या हिंदी भाषा परीक्षा, नियम, पाठयक्रम व पाठयपुस्तके.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक- हिभाप- १९७६- २८,
सचिवालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक १० जून १९७६.

वाचा :- १) शासन निर्णय, राजकीय व सेवा विभाग क्रमांक- २५४१- ३४, दिनांक १ सप्टेंबर १९५१.

२) शासन निर्णय, राजकीय व सेवा विभाग क्रमांक- ईएक्सआर- ११९२, दिनांक २८ एप्रिल १९५४.

३) शासन निर्णय, राजकीय व सेवा विभाग क्रमांक- ईएक्सआर- ११९२, दिनांक २५ नोव्हेंबर १९५४

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- ईएक्सएम- १९६१- जे, दिनांक २५ ऑक्टोबर १९६१.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- ईएक्सएम- १९६२- जे, दिनांक १४ मे १९६२.

६) शासकीय परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- ईएक्सएम- १९६४- म, दिनांक ७ जून १९६६

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- हिभाप- १९६६- न, दिनांक १ ऑक्टोबर १९६६

८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- ईएक्सएम- १९६६- न, दिनांक १८ नोव्हेंबर १९६६

९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- हिभाप- १५६६- न, दिनांक १९ डिसेंबर १९६६.

शासन निर्णय :- वर नमूद केलेल्या शासन निर्णयाव्दारे राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी विहीत करण्यात आलेल्या हिंदी भाषा परीक्षांची नियमावली, पाठयक्रम व पाठयपुस्तके यात खालीलप्रमाणे काही फेरबदल करण्याचा निर्णय शासनाने विचारांती घेतला आहे. हे फेरबदल तत्काळ लागू होतील.

अधिकारी कार्यालय, रत्नागिरी
4 FEB 1989
EST
जि. उ. जि. जिल्हाधिकारी

## नियमावली

१) पूर्वीच्या नियमांनुसार विहीत केलेल्या निम्नस्तर, उच्चस्तर व बोलभाषा हिंदी परीक्षा प्रत्येक शासकीय कर्मचा-यास उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. या परीक्षा शासकीय सेवेत रुजू झालेल्या दिनांकापासून तीन वर्षांच्या मुदतीत किंवा शासनाने काही कारणास्तव मुदत वाढविल्यास त्या मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. पूर्वीच्या नियमानुसार जे कर्मचारी हया परीक्षा यापूर्वी उत्तीर्ण झालेले असतील त्यांनी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहणार नाही. मात्र जे कर्मचारी हया परीक्षा अद्यापि उत्तीर्ण झालेले नसतील त्यांना परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

(कृ.मा.प.)

२) दिनांक १ ऑक्टोबर १९७६ रोजी ज्या कर्मचाऱ्यांच्या वयाची ४५ वर्षे पूर्ण होतील किंवा ज्या वेळी त्यांच्या वयाची ४५ वर्षे पूर्ण होतील अशा कर्मचाऱ्याला विहीत हिंदी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट राहील.

३) एतदर्थ मंडळाच्या उच्चस्तर व निम्नस्तर परीक्षेचा दर्जा अनुक्रमे माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या उच्चस्तर व निम्नस्तर हिंदी परीक्षेच्या समकक्ष राहील.

४) हिंदी भाषेच्या प्रचाराचे काम करणाऱ्या मान्यवर खाजगी संस्थांतर्फे घेतल्या जाणाऱ्या ज्या परीक्षांचा दर्जा एतदर्थ मंडळाच्या निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षांच्या समकक्ष मानला जाईल त्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व होणाऱ्या कर्मचाऱ्यांना एतदर्थ मंडळाच्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट राहील. अशा संस्थांची नावे व समकक्ष परीक्षांची यादी यथावकाश जाहीर करण्यात येतील.

५) जे शासकीय कर्मचारी विहीत मुदतीत किंवा त्यांच्या वयाची ४५ वर्षे पूर्ण होईपर्यन्त या परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांची वार्षिक वेतनवाढ उक्त मुदत संपल्यानंतर ही परीक्षा उत्तीर्ण होईपर्यन्त किंवा वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे सूट मिळेपर्यन्त रोखण्यात येईल.

या नियमानुसार रोखून धरण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ शासकीय कर्मचारी ज्या दिनांकास परीक्षा उत्तीर्ण होतील किंवा त्यांच्या वयाला ४५ वर्षे पूर्ण होतील त्या दिनांकापासून त्यांना देय होईल व पुढील सर्व वेतनवाढी कोणतीही वेतनवाढ रोखून धरण्यात आली नव्हती असे मानून त्यांना मिळतील. मात्र वेतनवाढ रोखून ठेवल्यामुळे कर्मचाऱ्यांना ज्या प्रत्यक्ष वेतनास मुकावे लागेल त्याची थकबाकी मिळण्याचा हक्क राहणार नाही.

## पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके

### उच्चस्तर हिंदी भाषा परीक्षा

माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या हिंदी भाषा उच्चस्तर परीक्षेसाठी वेळोवेळी जो पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके विहीत केली जातील तीच या परीक्षेलाही विहीत करण्यात येतील.

### निम्नस्तर हिंदी भाषा परीक्षा

माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या हिंदी भाषा निम्नस्तर परीक्षेसाठी वेळोवेळी जो पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके विहीत केली जातील तीच या परीक्षेलाही विहीत करण्यात येतील.

### बोलभाषा हिंदी परीक्षा

बोलभाषा हिंदी परीक्षेचा दर्जा व परीक्षा पद्धती यात कोणताही बदल करण्यात आलेला नसून ती पूर्वीप्रमाणेच राहील.

(पुढे चालू)

एच-४८६ (१०००-७-८३)

-219-

३

विहीत करण्यात आलेल्या पाठ्यक्रमानुसार हिंदी भाषेची परीक्षा पुनर्रचित एतदर्थ मंडळातर्फे ऑक्टोबर १९७६ मध्ये प्रथम व त्यानंतर दर सहा महिन्यांनी घेण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चं. वा. सराफ,
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,